पानी
फ़ाउंडेशन

तारीख : १ जानेवारी २०१७

प्रति.

सरपंच,

गाव:

तालुका:

जिल्हा:

विषय: ‘सत्यमेव जयते वॉटर कप- २०१७’ स्पर्धेमध्ये सहभागी होण्याबाबत.

आदरणीय सरपंच साहेब/ महोदया,

नमस्कार.

गेली कित्येक वर्ष आपण सर्वचजण पाण्याच्या संकटाशी लढत आहोत. या संकटाचं अतिशय गंभीर स्वरूप ‘दुष्काळाच्या’ रूपाने गावागावांमध्ये पसरतंय. हळूहळू महानगरंसुद्धा पाण्याच्या संकटाच्या विळख्यात सापडू लागली आहेत. या संकटाचं भविष्यातील महाभयंकर रूप आत्ताच ओळखून त्यावर काही तोडगा काढता येईल का? या उद्देशाने २०१६ मध्ये मी व माझ्या सहकाऱ्यांनी मिळून पानी फाउंडेशनची स्थापना केली. पानी फाउंडेशनचा पहिला उपक्रम होता, ‘सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा २०१६ ’.

कदाचित आपणास ठाऊक असेलंच की गेल्या वर्षी महाराष्ट्राच्या ३ तालुक्यांमध्ये ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. अमरावतीतील वरूड, बीड मधील आंबाजोगाई आणि सातार्‍यामधील कोरेगाव या तिन्ही तालुक्यांमधील अनेक गावांनी स्पर्धेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आणि या स्पर्धेच्या निमित्ताने स्वतःच्या गावात पाणलोट विकास करून स्वतःच्या हिमतीवर आपली पाण्याची समस्या दूर केली. या तीन तालुक्यांमध्ये एकूण मिळून वार्षिक १,३६८ कोटी लिटर इतका पाणीसाठा करण्याची

ऑफिस: ७०१, कक्कड मेन्शन, सारस्वत कॉलनी, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई– ४०००५४ | टेलीफोन: +९१९९२०३८८७४९
रजिस्टर्ड ऑफिस: १०६, अशोका इस्टेट, बाराखंबा रोड, न्यु दिल्ली– ११०००१ | फॅक्स: +९१११२३७२३९०९
इमेल: paanifoundation@paanifoundation.in | CIN: U73100DL2016NPL290319

क्षमता निर्माण झाली. या घवघवीत यशातून प्रेरणा घेऊन पानी फाउंडेशन आता महाराष्ट्राच्या ३० तालुक्यांमध्ये घोषित करत आहे, 'सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा – २०१७'.

स्पर्धेच्या या दुसऱ्या टप्प्यात सहभागी होण्यासाठी पुढील ३० तालुक्यांची निवड करण्यात आली आहे.
बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, केज आणि धारुर.
लातूर जिल्ह्यातील औसा आणि निलंगा.
उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम, परंडा आणि कळंब.
औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री आणि खुलताबाद.
सातारा जिल्ह्यातील कोरेगाव, माण आणि खटाव.
पुणे जिल्ह्यातील पुरंदर आणि इंदापूर.
सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी आणि जत.
सोलापूर जिल्ह्यातील सांगोला आणि उत्तर सोलापूर.
अकोला जिल्ह्यातील बार्शी-टाकळी, पातूर आणि अकोट.
वाशिम जिल्ह्यातील कारंजा.
यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव, कळंब आणि उमरखेड.
वर्धा जिल्ह्यातील आर्वी.
अमरावती जिल्ह्यातील वरुड आणि धारणी.

स्पर्धेचा कालावधी असणार आहे दिनांक ८ एप्रिल २०१७ ते २२ मे २०१७. या स्पर्धेच्या कालावधीत जी गावं पाणलोट विकास आणि जलसंवर्धनाची सर्वात जास्त कामं करतील ती गावं ह्या स्पर्धेत बक्षिसास पात्र ठरतील. श्रमदान हा या स्पर्धेचा आत्मा आहे. तेंव्हा अशा कामांना स्पर्धेच्या नियमांत जास्त गुण देण्यात येणार आहेत. स्पर्धेत भाग घेणाऱ्या गावांना स्पर्धेचे तपशीलवार नियम पाठवण्यात येतील. तसेच हे नियम आमच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. www.paanifoundation.in

ऑफिस: ७०१, कक्कड मेन्शन, सारस्वत कॉलनी, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई– ४०००५४ | टेलीफोन: +९१९९२०३८८७४९
रजिस्टर्ड ऑफिस: १०६, अशोका इस्टेट, बाराखंबा रोड, न्यु दिल्ली– ११०००१ | फॅक्स: +९१११२३७२३९०९
इमेल: paanifoundation@paanifoundation.in | CIN: U73100DL2016NPL290319

पानी
फ़ाउंडेशन

या स्पर्धेमध्ये विजेत्या होणाऱ्या गावांना पुढीलप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील:

प्रथम क्रमांक – रु. ५० लाख / द्वितीय क्रमांक – रु. ३० लाख / तृतीय क्रमांक – रु. २० लाख. याशिवाय प्रत्येक तालुक्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गावाला १० लाख रुपयांचे बक्षिस देण्यात येईल. (जर ते गावं राज्यातील सर्वोत्तम तिघांमध्ये नसेल तर)

स्पर्धेत सहभागी होण्यासाठीचा प्रवेश अर्ज या पत्रासोबत जोडला आहे. महत्वाचे असे की 'सत्यमेव जयते वॉटर कप' स्पर्धेत सहभागी होत असल्याबद्दलचा ठराव शक्यतोवर ग्रामसभेकडून मंजूर करून घ्यावा.

जर तुमची गटग्रामपंचायत असेल तर त्यातील प्रत्येक महसुली गाव हे स्वतंत्ररीत्या भाग घेऊ शकतं किंवा एका गटग्रामपंचायतीमधील सर्व महसुली गावं मिळून एक ग्रामपंचायत म्हणूनही तुम्ही भाग घेऊ शकता किंवा एकाच गटग्रामपंचायतीमधील काही महसुली गावे एकत्र मिळून स्पर्धेत भाग घेऊ शकता. **पण या तीनही पर्यायांत स्पर्धेचा प्रवेश अर्ज हा ग्रामपंचायतीमार्फतच भरून पाठवावा.**

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गावांना पाणलोट विकास आणि जलसंधारणाच्या कामाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने पाणलोट विकास आणि जलसंधारणाच्या कामाची आवड असणाऱ्या पाच ग्रामस्थांना चार दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी पाठवणे आवश्यक आहे. सहभागी ग्रामस्थांमध्ये किमान दोन युवक आणि दोन महिला असाव्यात अशी आमची आग्रहाची विनंती असेल. यंदा आम्ही ट्रेनिंगसाठी एक मोबाईल फोन ॲप वापरणार आहोत. या ॲपच्या वापरामुळे खूप गोष्टी सोप्या होणार आहेत. त्यामुळे अशी विनंती आहे की या ५ जणांपैकी कमीत कमी १ जण तरी असा असावा ज्याला स्मार्ट फोन वापरण्याची सवय आहे.

जर गटग्रामपंचायतीतील महसुली गाव स्पर्धेत सहभागी होत आहे, तर त्यांनी पाचाऐवजी किमान दोन आणि कमाल तीन ग्रामस्थांना चार दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी पाठवणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज मात्र ग्रामपंचायतीमार्फतच भरून पाठवावा.

ऑफिस: ७०१, कक्कड मेन्शन, सारस्वत कॉलनी, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई– ४०००५४ | टेलीफोन: +९१९९२०३८८७४९
रजिस्टर्ड ऑफिस: १०६, अशोका इस्टेट, बाराखंबा रोड, न्यु दिल्ली– ११०००१ | फॅक्स: +९१११२३७२३९०९
इमेल: paanifoundation@paanifoundation.in | CIN: U73100DL2016NPL290319

पानी
फ़ाउंडेशन

**ज्या गावांमधील सदस्य प्रशिक्षणात सहभागी होतील केवळ तीच गावं या स्पर्धेत भाग घेऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

स्पर्धेत भाग घेण्यासाठी कोणतीही प्रवेश फी नाही. प्रशिक्षण स्थळी होणारा सर्व खर्च ‘पानी फाउंडेशन’ कडून केला जाईल. प्रशिक्षण कार्यक्रमाचं ठिकाण आणि तारीख ग्रामपंचायतीस कळवले जाईल. प्रवेश अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख असेल ३१ जानेवारी २०१७.

प्रवेश अर्ज भरून आपण तो पानी फाउंडेशनने नियुक्त केलेल्या तुमच्या तालुका समन्वयकाकडे किंवा तुमच्या ग्रामसेवकाकडे जमा करावा. तुमच्या तालुका समन्वयकांची नावं व संपर्क क्रमांक प्रवेश अर्जावर देण्यात आली आहेत.

आपले काही प्रश्न / सूचना असल्यास आपण आम्हाला ०९९२०३८८७४९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करू शकता.

मला अत्यंत आनंद होत आहे की आपला तालुका या स्पर्धेत भाग घेण्यासाठी निवडला गेला आहे. तरी आपल्या गावाने ह्या स्पर्धेत सहभागी व्हावे ही विनंती.

आपला,
आमिर ख़ान

ऑफिस: ७०१, कक्कड मेन्शन, सारस्वत कॉलनी, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई– ४०००५४ | टेलीफोन: +९१९९२०३८८७४९
रजिस्टर्ड ऑफिस: १०६, अशोका इस्टेट, बाराखंबा रोड, न्यु दिल्ली– ११०००१ | फॅक्स: +९१११२३७२३९०९
इमेल: paanifoundation@paanifoundation.in | CIN: U73100DL2016NPL290319